**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** सालेकसा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0029 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/01/2026 04:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 12/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/01/2026

**Time From (वेळेपासून):** 14:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/01/2026 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2026 04:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तालुका कषी अधिकारी कार्यालय,सालेकसा व श्याम रेस्टरेंट अन्, कोल्र्डीक सेंटर गांधी प्रतिम,सालेकसा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पो.नि.उमाकांत गोवर्धन उगले

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : गोवर्धन उगले

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गों ,गोंदिया ,राम नगर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गों ,गोंदिया ,राम नगर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9664959090

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री रमेश मारोतीराव टाकरस | | वडील का नाम : मारोतीराव टाकरस | 1. सालेकसा ,सालेकसा , सालेकसा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रारदार पो.स्टे. ला हजर येताच तात्काळ

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ओडियो कॅसेट | 3 सनडीस्क कंपनीची 32 GB क्षमतेचे मेमरी कार्ड | 0.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | एक समसंग कंपनीचा मोबाईल फोन | 5,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे 10 चलनी नोटा | 5,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | आरोपीचे अंगावरील शर्ट | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांकः-

16.01.2026

नांवः- उमाकांत गोवर्धन उगले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 9664959090.

आज रोजी मी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, दिनांक 12/01/2026 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय गोंदिया येथे कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 10/30 वा. सुमारास आमचे मोबईल क्र. 9664959090 वर मोबाईल क्रमांक 9146278121 वरुन कॉल आल्याने तो कॉल आम्ही रिसीव्ह केला असता कॉल करणारे इसमाने त्यांचे नाव श्री. हौसलाल वलथरे रा. ईसनाटोला ता. सालेकसा असे सांगुन त्यांना तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथील श्री. टाकरस साहेब हे त्यांनी खरेदी केलेल्या रोटावेटरच्या शासकिय अनुदानाचे बिल काढुन दिल्याचा मोबदल्यात 10,000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने त्यांच्याविरुध्द तक्रार करायची आहे. माझे गांव नक्षल प्रभावित असुन, आपले गोंदिया येथील कार्यालय माझ्या गावापासुन लांब असल्याने तिथपर्यत येणे मला शक्य नाही. आपण सालेकसा पर्यत येऊ शकता काय? असे कळविल्याने, आम्ही त्यांना सालेकसा येथे येऊ शकतो, असे आश्वासीत करुन त्यांना गै.अ. मागीत असलेले 10,000/- रु. सोबत घेवुन येण्यास सांगुन वेळ 12/30 वा. पर्यत रोंडा नाल्याजवळ हजर येण्यास सांगीतले. तक्रारदार यांनी आम्हास फोनव्दारे दिलेल्या तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी नापोशि. संतोष बोपचे यांच्या हस्ते वर्ग-3 चे दोन कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 57/2026 दि. 12/01/2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 1134/2026 दि. 12/01/2026 अन्वये श्री. संजय रामसेवक चौबे व श्री. चित्रेस कृष्णकुमार भेलावे असे पंच म्हणुन उपलब्ध करुन दिल्याने दोन्ही पंच नापोशि. संतोष बोपचे यांचेसह वेळ 12/10 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर आले. नापोषि. संतोष बोपचे यांनी वरील नमुद दोन्ही पंचाची आमच्याशी ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमच्याकडे एका तक्रारदाराने एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबंधी फोनव्दारे तक्रार सांगीतली असुन, आपणास आमचे सोबत यायचे आहे, तक्रारदार हे सालेकसा परिसरात भेटतील त्यांची तक्रार ऐकुन घेवुन तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्याचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करुन पुढील कायदेशीर कारवाई

करावयाची आहे असे सांगुन सदर लाच सापळा कारवाईत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. संजय रामसेवक चौबे यांना पंच क्र. 1 तर श्री. चित्रेस कृष्णकुमार भेलावे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले. सापळा पार्टीतील सदस्यांचा नमुद दोन्ही पंचांषी परिचय करून दिला. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो. हवा मंगेश काहालकर यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटॉप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले.

यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्य शासकीय व खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथुन सालेकसा रोंढा नाल्याजवळ जाण्याकरीता 12/20 वा. रवाना होवुन 13/40 वा. सुमारास रोंढा नाल्याजवळ पोहचलो असता, आम्ही सांगीतल्या प्रमाणे नाल्याच्या जवळ रोडच्या बाजुला एक ईसम मोटारसायकलसह थांबुन दिसले. परंतु आम्ही त्यांना व ते आम्हास ओळखत नसल्याने थांबुन असलेले ईसम हे तक्रारदार आहेत किंवा कसे? याबाबत खात्री करण्याकरीता, आम्ही आमच्या अधिनस्त पोहवा. मंगेष काहालकर यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 7020756989 वरुन तक्रारदार यांच्या मोबाईल क्रमांक 9146278121 वर कॉल करण्यास सांगीतले, त्यावरुन पोहवा मंगेश काहालकर यांनी फोन केला असता रोडच्या बाजुला थांबुन असलेल्या ईसमाने फोन उचलुन मी नाल्याजवळच उभा असल्याचे सांगुन आमच्या शासकिय वाहनाजवळ आले. त्यांनी सकाळी मीच कॉल केला असल्याचे सांगुन आपले नाव- श्री. हौसलाल उरकुडाजी वलथरे, वय-50 वर्ष, रा. ईसनाटोला, ता. सालेकसा, जि. गोंदिया असे सांगीतले, आम्ही सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अशा प्रकारे नजरेआड आडोशाला ठेवुन व त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही विषयी सर्वांना समजावुन सांगीतले. त्यानंतर तक्रारदारास आम्ही, आमचा परिचय देऊन उपस्थित दोन्ही पंच व सापळा पथकाशी परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीबाबत विचारपुस केली व त्यांना त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगीतले असता, त्यांनी त्यांची तक्रार लिहुन आणली असल्याचे सांगुन आम्हास दिली. आम्ही ती तक्रार वाचुन दोन्ही पंचास वाचण्यास दिली, दोन्ही पंचानीं वाचुन व तक्रारदार यांनी आम्हा व दोन्ही पंचासमक्ष कथन केलेली तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्याने त्या तक्रारीवर दोन्ही पंचानी तारखेनीषी स्वाक्षरी केली, त्यांनतर आम्ही त्यावर स्वाक्षरी केली. तक्रारदार यांनी लिहुन आणलेली तक्रार खालील प्रमाणे.

दिनांक

12/01/2026

प्रति,

मा. पोलीस उपअधिक्षक साहेब,

जिल्हा गोंदिया

विषयः- अनुदान मंजुर करुन काढुन दिल्याच्या मोबदल्यात मला लाच मागणारे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सालेकसा येथील श्री टाकरस साहेब यांचेवर कायदेशीर कारवाई करणे बाबत.

तक्रारदारः- श्री हौसलाल उरकुडाजी वलथरे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. ईसनाटोला पोष्ट- तिरखेडी, तालुका सालेकसा जिल्हा गोंदिया. मो.क्र. 9146278121.

महोदय,

सविनय सादर की, मी वर नमुद पत्यावर माझे परीवारासह राहतो व शेती करुन आपले कुटूंबाची उपजिवीका भागवतो. माझे नावावर 5 एकर शेती असुन, त्या शेतीचे काम करण्यासाठी माझ्याकडे मेसी 241 कंपनीचा एमएच 36/एल 4326 क्रमांकाचा ट्रक्टर होता, तो ट्रॅक्टर विकुन मी मेसी कंपनिचाच नविन ट्रॅक्टर 246हा विकत घेतलेला व तो पासींग होणे बाकी आहे. प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY 2.0 वैयक्तीक लाभार्थी योजना) अंतर्गत शेतीचे कामे करण्यासाठी ट्रॅक्टरचे रोटावेटरची केंद्र शासनाची योजना आहे. त्या योजने अंतर्गत रोटावेटर खरेदीला शासनाचे 40,000/- रु. चे अनुदान तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सालेकसा मार्फत मिळत असल्याबाबत मला ग्रामपंचायत कार्यालय गिरोला येथुन माहीती मिळाली होती. माझेकडे ट्रॅक्टर आहे. परंतु रोटावेटर नव्हता. मला शेतीचे कामासाठी रोटावेटरची आवश्यकता असल्याने, मी ग्रामपंचायत कार्यालय गिरोला येथुन PMKSY 2.0 वैयक्तीक लाभार्थी योजनेचा फॉर्म उपलब्ध करुन घेतला होता. दिनांक 17/06/2025 रोजी मी, शिव अग्रो गोंदिया येथुन 1,05,000-/ रु. किंमतीचा शक्तीमान कंपनीचा रोटावेटर विकत घेतला आहे. ग्रामपंचायत कार्यालय गिरोला येथुन PMKSY 2.0 वैयक्तीक लाभार्थी योजनेचा फॉर्म भरुन त्यासाठी लागणारे कागदपत्रे व रोटावेटर खरेदी केलेले

जिएसटी बिल ही संपुर्ण कागदपत्रे त्या फार्म सोबत जोडुन, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे सहा महीन्यापुर्वी (मला नक्की तारीख आठवत नाही) दाखल करण्यासाठी गेलो असता, तिथे मला श्री. टाकरस साहेब, उपकृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा हे भेटले. त्यांना मी माझी ओळख सांगुन त्यांना मला शेतीचे कामाकरीता माझे ट्रॅक्टरसाठी रोटावेटरची आवश्यकता असुन तो रोटावेटर मी खरेदी केला आहे. परंतु PMKSY 2.0 वैयक्तीक लाभार्थी योजनेचा मला लाभ मिळावा या करीता मी आवश्यक कागदपत्रासह योजनेचा फार्म भरुन आणलेला आहे असे सांगीतले, तेव्हा त्यांनी, माझा फार्म दाखल करुन घेवुन मला रोटावेटरचे 40, 000-/रु. चे अनुदान मिळवुन देण्यासाठी 10,000/- रु. दयावे लागतील असे सांगीतले होते. तेव्हा मी त्यांना आता माझ्याकडे पैसे नसल्याबाबत सांगीतले असता, त्यांनी बिल मंजुर झाल्यावर मला दया असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना नाईलाजाने होकार देवुन निघुन आलो. दिनांक 12/12/2025 रोजी मी रोटावेटरचे अनुदानाचे 40,000/- रु. कधी येणार हे विचारण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे गेलो असता, कार्यालयाचे बाहेर उपकृषी अधिकारी श्री टाकरस साहेब भेटले. मी त्यांना रोटावेटरचे 40,000/- रु. चे अनुदान कधि येणार साहेब असे विचारले असता, त्यांनी मला, 8-10 दिवसात अनुदान तुम्हाला मिळुन जाईल असे सांगुन बिल मंजुर झाल्यावर 10,000/- रु. नक्की आणुन दया असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ठिक आहे साहेब, असे म्हणुन निघुन आलो. दिनांक 18/12/2025 रोजी PMKSY 2.0 वैयक्तीक लाभार्थी योजनेचे रोटावेटर खरेदीचे 40,000/- रु. अनुदान माझे बँक आफ महाराष्ट्र, सालेकसा चे खाते क्र. 60235492689 मध्ये जमा झाले. माझे खात्यावर अनुदान जमा झाल्यानंतर 2-3 दिवसांनी (तारीख नक्की आठवत नाही) श्री टाकरस साहेबांसोबत माझी भेट झाली असता, त्यांनी ठरल्याप्रमाणे 10,000/- रु. आणुन दे म्हणाले, तेव्हां मी त्यांना बँकेतुन पैसे काढले नसल्याबाबत सांगीतले. मला टाकरस साहेबांनी दि. 12/01/2026 रोजी 10,000/-रु. घेवुन बोलावले आहे. श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी, सालेकसा हे रोटावेटरचे 40,000/- रु.चे अनुदान मंजुर करुन काढुन दिल्याचे मोबदल्यात 10,000/- रु. मागत असुन ती शासकिय फिस नसुन, लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली असल्याने ती लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी सालेकसा यांचेबरोबर माझे कुठलेही देणे-घेण्याबाबत आर्थिक व्यवहार किंवा भांडण तंटा किंवा वैरभाव नाही. तरी श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी सालेकसा यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

त्यानंतर गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता तक्रारदार यांना 10,000/- रु. आणले का असे विचारले असता त्यांनी सोबत आणले असल्याचे सांगीतले. त्यावरुन त्यांनी स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या 500/- रू. दराचे 20 चलनी नोटा असे एकुण 10,000/- रू. आमचेकडे जमा केले. त्या नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिले. रू. 500/- दराचे 20 भारतीय चलनी नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली आहे. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रादार यांना अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुण त्याचे व व्हाईस रेकार्डचे प्रात्याक्षीक करुन दाखविले.

तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रारी नुसार गै.अ. श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी सालेकसा यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकार्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकार्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयीन "सोनी" कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाईस रेकार्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकार्डर फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांना खात्री करुन दिली. त्यानंतर प्लास्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV30166L असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कशा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कशा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व

व्हाईस रेकार्डर फार्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकार्ड फाईल नसल्याची खात्री केली. तक्रारदार यांनी गै.अ. श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी सालेकसा हे त्यांचे कार्यालयात हजर मिळु शकतात असे पंचासमक्ष सांगीतल्याने गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजच तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकार्डर बाहेर काढले व वेळ 14/19 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करुन ते व्हाईस रेकार्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे मोटार सायकल क्र. एम.एच. 35/ एन. 4647 ने गै.अ. यांचेशी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार हे गै.अ. यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हाईस रेकार्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 14/31 वाजता बंद केले. व्हाईस रेकार्डर च्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260112_1419.mp3 रेकार्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, "मी तक्रारदार यांचे सोबत त्यांचे मोटार सायकलने गै.अ. यांना भेटण्याकरीता तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे गेलो असता गैरअर्जदार तेथे दिसुन आले नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचे स्पिकर सुरु करुन गै.अ. यांचे मोबाईलवर फोन लावले असता गै.अ. यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे आम्ही काही वेळ त्यांचे कार्यालयात त्यांची वाट पाहत बसलो, काही वेळाने माहिती मिळाली की, गै.अ. हे शासकिय कामाने बाहेर गेले असल्याचे समजले. त्यामुळे मी तक्रारदार यांचे सोबत सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो असे पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकिकतीस तक्रारदार यांनीही दुजोरा दिला. त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डर च्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER- मध्ये फाईल 260112_1419.mp3 मध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कुठलेही संभाषन दिसुन आले नाही. आम्ही तक्रारदार यांच्यासोबत चर्चा करत असतांनाच गै.अ. यांचा तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन आल्याने तक्रारदार यांनी गै.अ. यांचा फोन आल्याचे आम्हास सांगीतले. त्यावरुन तक्रारदार यांना स्पिकर सुरु करुन बोलण्यास सांगीतले. गै.अ. यांनी तक्रारदार यांना तुम्ही मला फोन केला होता का? असे विचारुन मी बाहेर आहे, उद्या तुम्हाला फोन करतो तेव्हा आफीसला या असे सांगीतले. सदर फाईलमध्ये तक्रारदार व गै.अ. यांचे लाच मागणी संबधाने कोणतेही संभाषन झाले नसल्याने सदरचे मेमरी कार्ड लाच मागणी पडताळणी कामी उदईक रोजी वापरण्याचे ठरवुन त्याचे मुळ आवरणात सुरक्षीत ठेवुन एका कागदी लिफाफ्यात ठेवले. त्यावर आमचे व दोन्ही पंचाचे सहिचे कागदी लेबल लावुन तात्पुर्ते सिलबंद करुन ट्रप सुटकेस मध्ये ठेवण्यात आले. सदर बाबत पंचनामा क्र. 1 मध्ये सविस्तर नोंदी घेण्यात आल्या आहेत.

दिनांक 13/01/2026 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय गोंदिया येथे कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 10/15 वा. सुमारास आमचे मोबाईल क्र. 9664959090 वर तक्रारदार श्री. हौसलाल वलथरे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9146278121 वरुन कॉल करुन सांगीतले कि, त्यांना घरगुती अत्यंत महत्वाचे काम असल्याने ते दोन-तिन दिवसा करीता बाहेर गावी जात असल्याने लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत हजर राहु शकत नसल्याचे सांगुन बाहेर गावावरुन आपले कामे आटोपुन परत आल्यावर आपणास काल करतो त्यानुसार गै.अ. यांचे विरुध्दची पुढील कार्यवाही करावी असे विनंती केल्याने सदर बाबत दोन्ही पंचाना अवगत केले. व सदरची कार्यवाही तक्रारदार यांचा फोन आल्यावर करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दोन्ही पंचाना कार्यालयात हजर ठेवले. सदर बाबत पंचनामा क्र. 2 मध्ये सविस्तर नोंदी घेण्यात आल्या आहेत.

दिनांक 16/01/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक कार्यालयात हजर आहेत आम्ही कार्यालयीन कामे

करीत असतांना वेळ 11.10 वा सुमारास आमचे मोबाईल क्र. 9664959090 वर तक्रारदार श्री. हौसलाल बलथरे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9146278121 वरुन कॉल करुन सांगीतले कि, मी घरगुती महत्वाचे कामाने बाहेर गावी गेलो होतो. माझे कामे आटोपुन मी आपले स्वगावी परत आलो आहे. गै.अ टाकरस साहेब हे आपले कार्यालयात असल्याची मला माहिती मिळाली असुन आपण सालेकसा येथे या गै.अ. टाकरस साहेब यांचे विरुध्दची लाचमागणी कार्यवाही आजच करावी अशी विनंती केल्याने आम्ही दोन्ही पंच व सापळा पथकासह सालेकसा येथे येत असल्याचे सांगुन तक्रारदार यांना दिनांक 12.01.2026 रोजी ठरलेल्या ठिकाणी रोंडा नाल्याजवळ वेळ 12.00 वा पर्यंत हजर येण्यास सांगीतले.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो. हवा मंगेश काहालकर यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटाप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्य शासकीय व खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथुन सालेकसा रोंढा नाल्याजवळ जाण्याकरीता 11.30 वा. रवाना होवुन 12.20 वा. सुमारास रोंढा नाल्याजवळ पोहचलो असता, आम्ही सांगीतल्या प्रमाणे तक्रारदार हे नाल्याच्या जवळ रोडच्या बाजुला मोटारसायकलसह थांबुन दिसले. आम्ही सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अशाप्रकारे नजरेआड आडोशाला ठेवुन व त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही विषयी सर्वाना समजावुन सांगीतले. दिनांक 12.01.2026 रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान देण्यात आलेल्या सुचना व घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना पुनश्चः समजावुन सांगण्यात आल्या.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकार्डर द्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकार्ड करणे असल्याने दिनांक 12.01.2026 रोजी पंचनामा क्र. 1 कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले सॅनडिस्क कंपनीचे सिरीयल क्र. 5172XV30166L असलेला मेमोरी कार्ड ज्यामध्ये तक्रारदार व गै.अ यांचे कोणतेही संभाषण रेकार्ड झाले नसल्याने सदरचे मेमरी कार्ड लाच मागणी कार्यवाही पडताळणी दरम्यान पुन्हा वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यानुसार आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी कागदी लिफाफ्यात तात्पुरता सिलबंद करुन ठेवण्यात आलेले सॅनडिस्क कंपनीचे 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे सिरीयल क्र. 5172XV30166L असलेला मेमोरी कार्ड पंचासमक्ष लिफाफ्यातुन बाहेर काढुन "सोनी" कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये टाकुन सुस्थितीत करुन ठेवण्यात आले.

तक्रारदार यांनी गै.अ. श्री टाकरस साहेब, तालुका उपकृषी अधिकारी सालेकसा हे त्यांचे कार्यालयात हजर मिळु शकतात असे पंचासमक्ष सांगीतल्याने गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पंच क्रमांक 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकार्डर वेळ 12.58 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकार्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे मोटार सायकल क्र. एम.एच. 35/ एन. 4647 ने गै.अ. यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार हे गै.अ. यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरुन पो.ना. प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळ्यात असलेले व्हाईस रेकार्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 13.25 वाजता बंद केले. व्हाईस रेकार्डर च्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260116_1258.mp3 रेकार्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, "मी तक्रारदार यांचे सोबत त्यांचे मोटार सायकलने गै.अ. यांना भेटण्याकरीता तालुका कृषी अधिकारी कार्यालय

सालेकसा येथे गेलो असता तिथे दोन तिन ईसम बसून होते त्यापैकी तक्रारदार यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात बसुन असलेल्या एका इसमास टाकरस साहेब नमस्कारजी असे म्हटल्याने तेच गैरअर्जदार टाकरस साहेब असल्याची माझी खात्री झाली. टाकरस साहेब नमस्कार असे म्हटल्यावर गै.अ.टाकरस साहेब यांनी तक्रारदारास या या बसा, तुमचा फोन आला मला मगाच आठवण आली वलथरे साहेबाला फोन करायच राहीलं काही सालं लफड देवून ठेवलं कामाच बरेच फोनबीन येतात सांगा असे म्हटल्यावर तक्रारदार यांनी असा का तुमच्याकडे आलो होतो त्यादिवशीही आलो होतो सहाजिकच तुम्ही नव्हते त्या ठिकाणी असे बोलून तक्रारदारा सोबत इकडतिकडली चर्चा करुन गै.अ. टाकरस साहेब यांनी तक्रारदारास आले पैसे खत्यावर असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी हंव सर तूमचे पी.एम.के.एस.वाय.चे पैसे आले असे सांगीतले तेव्हा गै.अ.टाकरस यांनी आले ना बरे झाले धन्यवाद असे म्हटले तेव्हा तिथे हजर असलेल्या महीला कर्मचारी यांनी रोटावेटर होताना तुमचा कोणी मायडीपीकेवर नेचर सारखाचा होता ना यांच्या असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी रोटावेटर होता असे म्हटले, तेव्हा गै.अ. टाकरस साहेबांनी पन्नास हजारचा जावु दया, तक्रारदारयांनी अजून काही योजना आहेत का साहेब असे विचारले असता, गै,अ. यांनी काय पाहीजे तुम्हाला ते देवु सांगा का पाहीजे तुम्हाला असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी आपल्याला कापनी यंत्र पाहिजे असे म्हटले त्यावर गै.अ. टाकरस साहेबांनी प्रतीवाल का रिपर असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी हो छोटावाल असे म्हटले तेव्हा गै.अ. टाकरस साहेबांनी तो करतो ना ते सव्वा लाखाचे येते घेवुन घ्यान आता नका घेवु डायरेक्ट उन्हाळयाच्या धान कापत टाईमाला आल का लगेच कापनी चालु होवुन जाते असे म्हटले तेव्हा तेथे हजर असलेल्या महिला कर्मचारी यांनी पन्नास हजार सबसीडी रोटावेटरची झाली असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी नाही चाळीस हजार झाली असे म्हटले त्यावेळेस गै.अ टाकरस साहेब यांनी नाही रोटावेटर ला चाळीस हजार आली, आपण ओबीसी आहात ना आपले पैसे कापतील, ओबीसी आहे म्हणुन, फुकटाचा पंचेचाळीस हजार आलेत काही, एसी. असत्यान तुम्ही पंचेचाळीस आले असते असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी चाळीस हजार आले असे सांगीतले, तेव्हा गै.अ टाकरस साहेबांनी हा बरोबर दहा हजार रुपये कटतेत आता छेचाळीस हजार रुपये करातो ना तुम्हाला, पंचेचाळीस हजार दिले, त्यात आपण ओबीसी नाहीत, तेव्हा तक्रारदार यांनी एन.टी मध्ये येतो असे सांगीतले, त्यावर गै.अ. टाकरस साहेबांनी एसी. एसटी सोडल्यानंतर सगळयांना ओबीसी पकडल्या जाते असे म्हटले, त्यानंतर त्यांच्यात इतरत्र गोष्टी झाल्या, त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. यांना धन्यवाद करतो तुम्हाला तुम्ही चांगले काम केले माझे त पैसे जमा झाले धन्यवाद असे म्हटले, त्यावर गै.अ यांनी नाही काही अडचन नाही, त्यावर तक्रारदार यांनी काही तुम्ही म्हणले होते ना ते असे विचारले त्यावर गै.अ यांनी हो कुठले असे विचारल्यावर तक्रारदार यांनी सबसिडीचे तुम्ही बोला ना साहेब असे विचारले त्यावर गै.अ यांनी नाही काही अडचन नाही घरातली गोष्ट आहे ते काही विषय नाही तसा काही नाही, त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही बोलाना असे म्हटले त्यावर गै.अ यांनी काय तुम्हाला दयाची इच्छा असेल तर तुम्ही देवुन दया तसा काहीच मागत नाही असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी किती देवु सात हजार देतो असे म्हटले, त्यावर गै.अ यांनी दया तुम्हाला जस वाटत तस दया त्यावर तक्रारदार यांनी जास्त नाही होतील का असे म्हटले तेव्हा गै.अ. यांनी तुम्हाला जे वाटल ते मी म्हनल का शब्द काढल का असे म्हणून सात नका देवु पाचच दया असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी पाच हजार देवु बस येतो बँकेतुन तुम्ही रहालना ईथे आफीसमध्ये तुम्हाला फोन करतो लगेच येतो अध्र्या तासात असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी ठिक आहे काही अडचन नाही आरामशीर या नाहीतर घराकडे आलो तर घराकडे देवुन दयाल असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे असे म्हणुन मी तक्रारदार यांचे सोबत सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो असे पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीस तक्रारदार यांनीही दुजोरा दिला.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डर च्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260116_1258.mp3 मध्ये तक्रारदार व गै. अ. यांच्यातील रेकार्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचाना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास तक्रारदार यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुन तसेच तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या रोटावेटरचे 40,000-/रु. चे अनुदान मिळवुन दिल्याचा मोबदला म्हणुन गै. अ यांनी तक्रारदार यांना देवुन दया आपले ईच्छेनुसार असे म्हणुन सात नका देवु पाचच दया असे म्हणुन रुपये 5000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. असल्याने सापळा कार्यवाही त्यांचे कार्यालयात जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविले. पंच क्रमांक 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे रु. 5,000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. तक्रारदार यांनी तक्रार देते वेळी गै.अ यांनी 10,000/- लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार दिली होती त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गै.अ यांना लाचेमध्ये देण्यासाठी रक्कम रु. 10,000/- आमचेकडे जमा केले होते. परंतु

लाच मागणी पडताळणी दरम्यान गै.अ. यांनी तक्रारदाराकडुन रु. 5,000/- लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने अंथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 20 चलनी नोटा असे एकुण रू.10,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा आमचे सुचनेवरुन नापोशि संतोष शेंडे यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन त्यामधुन रु. 500/- दराच्या 10 नोटा वेगळया करुन पंच क्र. 1 यांचेकडे दिल्या व उर्वरीत रु. 500/- दराच्या 10 नोटा त्याच लिफाफयात ठेवुन ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी रु.500/- दराचे 10 चलनी नोट असे एकुण रु.5,000/- लाच रक्कम तक्रारदार यांचे फुलपॅंटचे समोरील उजवे खिश्यात ठेवुन दिल्या त्या नोटांचे क्रमांक खालील प्रमाणे.

2QL 777999
1MA 611236
9EM 471176
8LF 343982
3PF 820611
0GE 585008
4FU 844629
4FU 844628
8WT 879520
9QD 419156

त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याचप्रमाणे नापोशि प्रशांत सोनवाने यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा करतील त्यावेळेस तसेच आरोपी कडुन जप्त करण्यात येणाऱ्या कार्यवाहीवेळी आपण आपले मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अशा सुचना देवुन त्यांचे मोबाईलमध्ये 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र5116XV7323WH असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन नापोषि प्रषांत सोनवाने यांचे SAMSUNG PLUS कंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये Insert केले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोषि प्रशांत सोनवाने यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकार्डर मधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमरी कार्ड बाहेर काढुन त्यांचे मुळ आवरणाममध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले. त्यानंतर प्लास्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV30144Q असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोषि प्रशांत सोनवाने यांनी वेळ 14.20 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकार्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळ्यात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे खाजगी मोटारसायकलने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे रवाना करण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, पो.हवा.मंगेश काहालकर, नापोशि संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, व चानापोशि दिपक बाटबर्वे हे शासकीय वाहन क्र. एम.एच. 35/एडब्लु-0486 ने तर पोनि अरविंद राऊत, स.फौ.चंद्रकांत करपे, नापोशि.संतोष शेंडे, कैलाश काटकर, अशोक कापसे हे खाजगी चारचाकी वाहनाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा जवळ पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संशय येणार नाही अशा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईशाऱ्याची वाट पाहत बसलो. काही वेळाने तक्रारदार हे तालुका कृषी अधिकारी कार्यालयातुन बाहेर निघुन नियोजित ईशारा न करता आपले मोटार सायकलने पंच क्रमांक. 1 यांचेसह रोडाने जातानी दिसले व आपले मागोमाग येण्याचा हातानी इशारा केला त्यावरुन आम्ही त्यांचे पासुन काही अंतर ठेवुन त्यांचे मागोमाग जावु लागलो. तक्रारदार हे श्याम रेस्टारेंट उपहारगृह अन्ड कोल्ड्रींक्स, बाजार चैक सालेकसा असे बोर्ड लाहुन असलेल्या दुकानात जातांनी दिसले. त्यामुळे आम्ही सदर रेस्टारेंटच्या आजुबाजुला तक्रारदार यांच्या नियोजित इशाऱ्याची वाट पाहत बसलो.

त्यादरम्यान वेळ 15.20 वा. चे सुमारास तक्रारदार यांनी श्याम रेस्टारेंटच्या बाहेर येवुन आपल्या डोक्यावरील कॅप काढुन हातात ठेवला हा गै.अ. यांनी त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित ईशारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईशारा पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचलो. आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कुठे ठेवली याबाबत ईशाराने विचारले असता त्यांनी हाटेलचे आतमध्ये खुर्चीवर बसुन असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन त्यांनी लाच रक्कम स्विकारली असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम कोणी स्विकारली व ती त्यांनी कोठे ठेवली आहे? असे विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, तक्रारदार यांनी त्यांचे फुलपॅंटचे उजवे खिश्यात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 5,000/- उजव्या हाताने काढुन रेस्टारेंट मध्ये बसुन असलेले गै.अ. टाकरस साहेब यांचेकडे दिली असुन त्यांनी ती लाच रक्कम आपले डावे हाताने स्विकारुन आपले शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवले आहे असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हाईस रेकार्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकार्डर 15.25 वाजता बंद केले. व्हाईस रेकार्डर च्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260116_1420.mp3 रेकार्ड झाल्याचे दिसुन आले. लाच रक्कम स्विकारलेल्या इसमाजवळ जावुन गै.अ. टाकरस साहेब यांना आमचा, दोन्ही पंचांचा व सापळा पार्टीतील सर्व सदस्यांचा परिचय देवुन त्यांना कार्यवाही कामी सहकार्य करण्याबाबत सुचना दिल्या. त्यावर ते त्याच ठिकाणी बसुन राहीले. आम्ही लाच रक्कम स्विकारणाऱ्या इसमास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्री रमेश मारोतराव टाकरस वय 50 वर्ष, पद-उप कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा मुळ पत्ता- प्रसाद पॅलेस, रुम नंबर 612 बी, न्यु सुभेदार ले आउट उदयनगर नागपूर ता. जि. नागपूर असे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा मंगेश काहालकर यांनी शासकीय वाहनात ठेवलेली ट्रॅप सुटकेस व साहीत्य आणले. त्यानंतर आम्ही पोहवा मंगेश काहालकर यांना आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासण्यास सांगितले. त्यांनी काळ्या कापडाच्या सहाय्याने प्रकाषाची तीव्रता कमी केली. त्यानंतर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात सर्वप्रथम आम्ही, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांचे हात तपासले असता कोणाचेही हातास कोणत्याच प्रकारची चकाकी दिसून येत नसल्याची गै.अ.यांना खात्री करुन दिली. त्यानंतर काळा कापड हटवुन प्रकाश पुर्ववत करण्यात आला. त्यानंतर आरोपी रमेश मारोतराव टाकरस यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन आपले शर्टचे खिश्यात ठेवले असल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांना सदर लाच रक्कम रु.500 दराचे 10 चलनी नोटा असे एकुण रू. 5,000/- आरोपीने परिधान केलेल्या शर्टचे खिश्यातुन बाहेर काढुन आपल्या हातात ठेवल्या. आम्ही त्यांना गै.अ. हे बसुन असलेल्या रेस्टारेंट मधील टेबलावर एक कोरा कागद आंथरून त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवण्यास सांगितले. त्यानुसार पंच क्र. 1 यांनी त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवल्या. सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचुन दाखविले व पंच क्र. 1 यांनी ते तक्रारदार यांनी लाच रक्कम जमा करतेवेळी तयार केलेल्या लाच रकमेच्या नोटांच्या यादीतील क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता सापळा कार्यवाही करीता जातांना रु.500/- दराचे 10 चलनी नोटांचे क्रमांक व गै.अ. यांनी स्विकारलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर सदरच्या नोटा व गै.अ. यांचेकडे असलेला SAMSUNG कंपनीचा AF 41 माडेल असलेला मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी रमेश मारोतराव टाकरस यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन पुराव्याकामी व तपासकामी जप्तीपत्रक क्र. 1 अन्वये जप्त करण्यात आला. सदरबाबत मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना ते तक्रारदारासह रोंडा नाल्याजवळुन निघुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा व श्याम रेस्टारेंट सालेकसा येथे पोहचुन नियोजित इशारा करेपर्यंत घडलेल्या घटना व झालेले संभाषण याबाबत सविस्तर माहिती सर्वासमक्ष पंच क्र. 2 यांना सांगण्याबाबत निर्देष दिले. त्यावरून पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे आहे. "मी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे मोटारसायकलने रोंडा नाल्याजवळुन तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे गेलो असता गै.अ. टाकरस हे त्या ठिकाणी दिसुन न आल्याने तक्रारदार यांनी तिथे हजर असलेल्या व्यक्तीस टाकरस साहेब कोठे गेले असे विचारले असता त्या व्यक्तीने माहीत नाही कोठे गेले तर रुमवर गेले असतील असे सांगीतले, त्यावर तक्रारदार यांनी तिथे हजर असलेल्या व्यक्तीस मौजे सर लावुन टाकाना साहेबाला फोन कोठे गेले त, कोठी बाहेर गेले का अर्जेट काम होता रुमवर नसेत असे म्हटले, त्यावर त्या व्यक्तीने बाहेर गेले असतील चेक करायला गेले असतील येतीन असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी तुमचे टाकरस साहेब भेटतच नाही असे म्हणुन इकड तिकडच्या गोष्टी केल्या व गै.अ. टाकरस साहेब यांची वाट पाहात बसलो, काही

वेळाने गै.अ यांचा तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन आला तक्रारदार यांनी आपले मोबाईलचे स्पिकर सुरु करुन फोन उचलला असता तक्रारदार यांनी हॅलो साहेब कोठे आहात तुम्ही असे विचारले असता गै.अ. यांनी मी ईकडेच आलो कचारगडला आलो एक टिम आली होती पुण्याची मुंबईची असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी मी पाच हजार रुपये घेवुन आलो होतो साहेब किती वेळ लागल तुम्हाला असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी दहा पंधरा मिनीट लागतील आल्यावर सांगतो, असे म्हटले, तेव्हा तक्रादार यानी ठिक आहे असे म्हणुन त्याच ठिकाणी त्यांचे फोनची वाट पाहात थांबुन राहीलो, काही वेळाने गै.अ यांनी तक्रारदार यांना फोन करुन वलथरे सर कोठे आहात आलो मी आफीसच्या समोर आहे तुम्ही आलेत का, असे विचारल्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे या आफीसमध्ये येतो मी थोडयावेळात ईकडे थोडासा साईडला आहे बाजार चैकाकडे असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी बर ठिक आहे, असे म्हटले, लगेच काही वेळाने गै.अ. यांनी पुन्हा तक्रारदार यांना फोन करुन मी हया चैकाकडे आलो तुम्ही या बाजार चैकाकडे बाजार चैकात आहे, आपलया कृषी केंद्राकडे आले की सांगा मी तिकडे आलो दुकानाकडे आपल्या रुमकडे आलो असे सांगीतले त्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे असे म्हटले, त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेसह बाजार चैकाकडे गेलो असता गै.अ हे श्याम रेस्टारेट चे बाहेर आमची वाट पाहात उभे होते, तक्रारदार यांनी गै.अ. यांना चला आतमध्ये चहा घेवु असे म्हटल्याने आम्ही त्यांचेसोबत रेस्टारेंट चे आतमध्ये गेलो. तक्रारदार यांनी गै.अ. यांना मुला जवळुन पैसे आणले असल्याचे सांगुण तक्रारदार व गै.अ. यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी घ्या साहेब तुमचे पाच हजार रुपये असे म्हणुन आपले फुलपॅटचे उजवे खिषात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 5000/- उजव्या हाताने काढुन गै.अ श्री टाकरस साहेब यांना दिली असता गै.अ. यांनी दया तुम्ही जवळचे माणस आहा काही विषय नाही त्याच्यामध्ये असे म्हणुन तक्रारदार यांचेकडुन ती रक्कम डाव्या हाताने स्विकारुन आपले शर्टचे खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांचेसह रेस्टारेंटचे बाहेर येवुन तक्रारदार यांनी सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यानंतर आपण पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली." अशी घटनेची हकीकत पंच क्र. 1 यांनी पंच क्र. 2 यांना सर्वासमक्ष सांगितली. यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामामध्ये घेण्यात आले आहेत. तरी दिनांक 12.01.2026 रोजी तक्रारदार श्री हौसलाल उरकुडाजी वलथरे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 16.01.2026 चे 12.58 वा ते 15.25 वा दरम्यान तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा व श्याम रेस्टारेंट अन्ड कोल्ड्रींक सेंटर बाजार चौक सालेकसा येथे पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री रमेश मारोतीराव टाकरस पद-उप कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या रोटावेटरचे 40,000-/रु. चे अनुदान मंजुर करुन घेवुन ते मिळवुन दिल्याचा मोबदला म्हणुन गै. अ यांनी तक्रारदार यांना देवुन दया आपले ईच्छेनुसार असे म्हणुन सात नका देवु पाचच दया असे म्हणुन रुपये 5000/- लाच रक्कमेची मागणी करुन पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री रमेश मारोतीराव टाकरस यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (संशोधन अधिनीयम 2018 ) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणेकरीता कायदेशिर फिर्याद देत आहे.

(उमाकांत उगले)
पोलीस निरीक्षक
लचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BHUSHAN YADORAO BURADE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHUSHAN YADORAC

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**)**)

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)